संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20

12 AUG 2025

प्राप्त झाले सही...................

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लेखा अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदलीबाबत.
श्री. जितेंद्र शं. पोळ व श्रीम. चैताली सं. जाधव.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
शासन आदेश :-संलेको-२०२५/प्र.क्र.७९/कोषा प्रशा-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १२.०८.२०२५.

संदर्भ : वित्त विभाग, शासन निर्णय क्र.सेवाप्र-२०२४/प्र.क्र.१३६/कोषा प्रशा-३, दि.२०.०६.२०२५.

## शासन आदेश

महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार, मुंबई या कार्यालयाकरीता संदर्भाधीन शासन निर्णयान्वये एकुण २७ नवीन पदे निर्माण करण्यात आली आहेत. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लेखा अधिकारी संवर्गातील (एस-१६: रुपये ४४९००-१४२४००/-) खालील विवरणपत्रात नमुद अधिकाऱ्यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासन अधिसूचना दि.१४.०७.२०२१ मधील तरतूदींनुसार त्यांचा स्तंभ क्र.३ येथे नमूद केलेला महसूल विभाग बदलून त्यांना स्तंभ क्र.४ येथे नमूद केलेल्या महसूल विभागात महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ मधील कलम ४(४) व ४(५) मधील तरतुदीनुसार खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.५ मध्ये नमूद पदावर बदली करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व कार्यालय | सध्याचा कार्यरत महसूल विभाग | बदलून दिलेला महसूल विभाग | महसूल संवर्ग बदलीने पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | श्री. जितेंद्र शंकर पोळ, लेखा अधिकारी, जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण जीवनोन्नती अभियान, पालघर | कोकण-१ | कोकण-२ | अप्पर कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार, मुंबई. |
| २. | श्रीमती चैताली संतोष जाधव, अप्पर कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, पालघर | कोकण-१ | कोकण-२ | अप्पर कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार, मुंबई. |

Comp. 12/8.

२. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिकाऱ्यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी बदली अधिकाऱ्याची प्रतिक्षा न करता स्थानिक व्यवस्था करुन संबंधित अधिकाऱ्यांस तात्काळ कार्यमुक्त करावे.

३. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिकाऱ्यांनी बदली झालेल्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. संबंधित अधिकाऱ्यांनी बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांना अवगत करावे.

५. वरील अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तीक माहितीचा तपशिल HRMS मधील नमून्यात भरुन नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत शासनास तसेच संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(ता. र. पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल -१/२(लेखा व अनुज्ञयेता /लेखा परीक्षा) महाराष्ट्र मुंबई/नागपूर *
२. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४. प्रधान सचिव (ले. व को.), यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
५. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई,*
६. संबंधित अधिकाऱ्याचे सध्याचे कार्यालय प्रमुख*,
७. संबंधित अधिकाऱ्याचे बदली झालेल्या कार्यालयाचे प्रमुख.*
८. संबंधित अधिकारी *
९. निवड नस्ती कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(* संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)

D:\gaurav dande\बदली\AO\सायबर ट्रेझरी ७९-२०२५.docx